॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

❋ सुविचार ❋
जो नेहमी हसतो
तो नेहमी विजयी होतो.

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. १३ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


# पेपर फुटीच्या प्रकरणाने नीट परीक्षा रद्द

## केंद्राचा निर्णय, सावळागोंधळ पुन्हा चव्हाट्यावर । २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

राज्यातील १० वी आणि १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून १० वीनंतर अनेकांनी नीट परीक्षेची तयारी सुरू केली तर १२ वीच्या परीक्षेनंतर कित्येक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा देऊन भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र, नीटची परीक्षा होऊन १० दिवसही उलटत नाहीत, तोच केंद्र सरकारने ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द केली. पेपर फुटल्याची बाब समोर आल्याने केंद्राने हा निर्णय घेतला. आता ही परीक्षा नव्याने घेण्यात येणार आहे. नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि भाजपवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. देशातील तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य सरकारने उद्ध्वस्त केल्याचा आरोप त्यांनी केला.

देशातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांनी यंदा ३ मे २०२६ रोजी नीटची परीक्षा दिली होती. त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास अडीच लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. मात्र, देशभरात ४२ तास अगोदरच या पेपरची प्रश्नपत्रिका बाहेर आल्याने पेपर फुटला होता. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेकडून नीट परीक्षा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात एनटीएने म्हटले की, ८ मे रोजी हे प्रकरण




पडताळणीसाठी केंद्रीय यंत्रणाकडे सोपविण्यात आले. तपास यंत्रणांकडून मिळालेली माहिती आणि अहवालाच्या आधारे परीक्षा रद्द करण्याचा कठीण निर्णय घेण्यात आला.

देशभरात गेल्याच आठवड्यात म्हणजे ३ मे २०२६ रोजी नीटची परीक्षा घेण्यात आली होती. राजस्थान पोलिसांच्या विशेष ऑपरेशन ग्रुपने केलेल्या तपासात परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधीच प्रश्नपत्रिका टेलिग्राम आणि व्हॉटसअॅपवर फिरत असल्याचे समोर आले. या प्रकरणी आतापर्यंत १३ संशयितांना अटक केली आहे. या पार्श्वभूमीवर नीटची परीक्षा रद्द करण्यात आली. आता या पेपरफुटीची सीबीआयमार्फत चौकशी होणार आहे.

या निर्णयाचा सर्वाधिक फटका मागील दोन वर्षांपासून मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी अत्यंत कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र, अचानक परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थ्यांवर मोठा मानसिक ताण निर्माण झाला आहे. खेडेगावातील विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण ठरत आहे. पुन्हा शहरात जाऊन राहणे, हॉस्टेलचा खर्च करणे, क्लासेस किंवा टेस्ट सिरीज जॉईन करणे, यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांची चिंता वाढली आहे.

नीटचा पेपर पीडीएफ स्वरूपात व्हॉट्सअॅप आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून देशभर पसरवण्यात आल्याचा संशय आहे. संशयास्पद सॅम्पल पेपर नेमका कोठून आला, याचा तांत्रिक तपास आता सुरू झाला आहे.

३ मे २०२६ रोजी झालेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली असून, आता नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर होईल, असे सांगण्यात आले. परीक्षार्थींचे परीक्षा केंद्र ३ मे रोजीचेच राहणार असून विद्यार्थ्यांना नव्याने रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांकडून नव्या परीक्षेसाठी शुल्क घेतले जाणार नाही.

नव्या परीक्षेसाठी नवे ओळखपत्र दिले जाणार आहेत. विद्यार्थी, पालकांनी फक्त एनटीएच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केंद्राकडून करण्यात आले.

### नाशिकमधून पेपर फुटला!

■ नाशिकमधून नीट परीक्षेचा पहिला पेपर फुटला. येथून पहिली प्रश्नपत्रिका बाहेर पडल्याची माहिती समोर आली. या प्रकरणात नाशिक गुन्हे शाखेने ३० वर्षीय संशयित शुभम खैरनार याला बेड्या ठोकल्या. ओळख लपवण्यासाठी त्याने चक्क टक्कल केले होते. मात्र नाशिक पोलिसांच्या नजरेतून तो सुटला नाही.

### सीबीआयमार्फत चौकशी

■ राष्ट्रीय परीक्षा संस्थेने आरोपांच्या सखोल चौकशीसाठी हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. एनटीए विभागाला पूर्ण सहकार्य करेल आणि चौकशीसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य, नोंदी दिल्या जातील, असे एनटीएतर्फे सांगण्यात आले.

## SPOT NEWS

### एसआयटीनंतर आता ईडीचे रूपाली चाकणकरांना समन्स

● **नाशिक** – नाशिकमधील भोंदूबाबा म्हणून ओळखल्या जाणा-या अशोक खरात प्रकरणाने आता मोठे वळण घेतले असून, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष तपास पथकाकडून नुकतीच त्यांची सविस्तर चौकशी करण्यात आल्या आहेत. अशोक खरात याच्यावर मोठ्या प्रमाणात खंडणी उकळल्याचे गंभीर आरोप आहेत. तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, या कथित रॅकेटमधून ७० कोटी रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या पैशांचे व्यवहार लपवण्यासाठी अनेक बेनामी बँक खात्यांचा वापर करण्यात आल्याचेही समोर आले आहे. या आर्थिक व्यवहारांशी संबंधित काही धागेदोरे रूपाली चाकणकर यांच्यापर्यंत पोहोचल्याने तपास यंत्रणांनी त्यांच्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. या व्यवहारांमध्ये त्यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध होता का, याचा आता सखोल तपास सुरू आहे.

### राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्वपक्षीय बैठक बोलवा

● **बारामती** – मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धजन्य आणि अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी केलेल्या घोषणांवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. या परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत:च्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे. राष्ट्रीय हिताशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेताना सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. देशासमोर निर्माण झालेल्या परिस्थितीत एकत्रित चर्चा आणि व्यापक सल्लामसलत गरजेची असल्याचे सांगत पवार यांनी केंद्र सरकारने संवेदनशीलतेने भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. देशहिताच्या मुद्यांवर सामूहिक निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावी ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले. शरद पवार यांनी पुढे अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि विविध तज्ज्ञांची तातडीने बैठक घेण्याचीही मागणी केली आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रावर काय परिणाम होऊ शकतो, याचा सखोल आढावा घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## जिल्ह्यात उष्मालाटेचा 'यलो अलर्ट'

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १२ ते १४ मे २०२६ दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

प्रशासनाने नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत : नागरिकांनी काय करावे ? तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे, तसेच घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करावा. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा.प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.उन्हापासून बचाव करण्यासाठी हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा व थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.

## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा उद्या शपथविधी

### सभापती प्रा. राम शिंदे सदस्यत्वाची शपथ देणार

● **मुंबई । वीरभूमी** –

महाराष्ट्र विधानपरिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारे व्दिवार्षिक निवडणूकीत बिनविरोध निवडून आलेले नऊ सन्माननीय सदस्य आणि पोटनिवडणूकीत विजयी झालेल्या एक सन्माननीय सदस्या अशा दहा नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांचा शपथविधी गुरुवार, दिनांक १४ मे, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे होणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेचे माननीय सभापती प्रा. राम शिंदे हे या दहा सदस्यांना सदस्यत्वाची शपथ देतील.

यामध्ये डॉ. नीलमताई गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशन झिआउद्दीन सिध्दीकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे, संजय नथ्थुजी भेंडे हे सदस्य शपथ घेतील.

या नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांना सभापती महोदय शपथ देतील. या शपथविधी समारंभास विधानसभेचे अध्यक्ष माननीय ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस, उप मुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथजी शिंदे आणि माननीय श्रीमती सुनेत्राताई पवार, विधानसभेचे उपाध्यक्ष माननीय श्री. अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील यांना निमंत्रित करण्यात आले असून या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असेल. विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांनाही शपथविधी समारंभासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. विधानपरिषदेच्या विद्यमान उप सभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे सलग पाचव्यांदा सदस्यत्वाची शपथ घेतील.

# राष्ट्रवादी अजित पवार गटात जुन्या फळीला 'रामराम'?

## ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरेंना कार्यकारिणीतून बाहेरचा रस्ता

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीवरून मोठा राजकीय गोंधळ निर्माण झाला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाला २९ एप्रिल २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या कार्यकारिणीच्या यादीत प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि सुनील तटकरे यांसारख्या मातब्बर नेत्यांची नावे नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे, या नवीन रचनेत सत्तेची सर्व केंद्रे एकाच कुटुंबाभोवती केंद्रित झाल्याचे पाहायला मिळत आहे.

या नव्या यादीतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पक्षातील अनुभवी आणि 'चाणक्य' मानल्या जाणाऱ्या नेत्यांना डच्चू देण्यात आला आहे. प्रफुल्ल पटेल गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ पक्षाचा राष्ट्रीय चेहरा राहिलेले प्रफुल्ल पटेल यांचे नाव वगळल्याने राजकीय विश्लेषक थक्क झाले आहेत. अजित पवारांनी जेव्हा वेगळी चूल मांडली, तेव्हा पटेल त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. अशा नेत्याला बाजूला सारल्याने पक्षात 'सर्व काही आलबेल नाही' असे संकेत मिळत आहेत. सुनील तटकरे महाराष्ट्रातील पक्षाचे एकमेव लोकसभा खासदार असलेल्या सुनील तटकरे यांनाही सरचिटणीस पदावरून हटवण्यात आले आहे. छगन भुजबळ, हसन मुश्रीफ आणि दिलीप वळसे पाटील यांसारख्या दिग्गज नेत्यांची नावेही गायब असल्याने, पक्षाने जुनी फळी पूर्णपणे बाजूला सारल्याचे स्पष्ट होत आहे.

नवीन रचनेनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसची



सर्वोच्च पदे आता 'पवार' कुटुंबातच विभागली गेल्याचे चित्र आहे: सुनेत्रा अजित पवार: राष्ट्रीय अध्यक्ष, पार्थ पवार: राष्ट्रीय सरचिटणीस, जय पवार: राष्ट्रीय सचिव यांचा समावेश आहे.

एकाच वेळी कुटुंबातील तीन सदस्यांकडे महत्त्वाची पदे गेल्यामुळे पक्षात घराणेशाही वरचढ ठरत आहे का? अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. जुन्या आणि जाणत्या कार्यकर्त्यांमध्ये यामुळे तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे समजते. जुन्या नेत्यांना वगळतानाच काही नवीन आणि अपरिचित चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. यामध्ये धनंजय शर्मा, राणा रणवीर सिंग, डॉ. रमण प्रीत सिंग आणि डॉ. अभिषेक बोके यांचा समावेश आहे. या बदलांमागे पार्थ पवार यांचा मोठा प्रभाव असल्याचे बोलले जात आहे. ही यादी समोर आल्यानंतर पक्षात मोठी खळबळ उडाली असून, सुनेत्रा पवार यांनी ही केवळ 'तांत्रिक चूक' असल्याचे सांगत सारवासारव करण्याचा प्रयत्न केल्याचेही वृत्त आहे. मात्र, निवडणूक आयोगाकडे गेलेल्या या पत्राने अजित पवार गटातील अंतर्गत संघर्षाला तोंड फोडले आहे. अजित पवारांच्या निधनानंतर (जानेवारी २०२६ मधील अपघाती निधन) पक्षाची धुरा सुनेत्रा पवारांकडे आली आहे. मात्र, अशा प्रकारे वरिष्ठ नेत्यांना डावलल्याने आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षात उभी फूट पडते की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### राष्ट्रवादीच्या कार्यकारणीच्या यादीत त्रुटी; सुनेत्रा पवारांकडून स्पष्टीकरण

■ राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवीन कार्यकारणीच्या यादीवरून राजकीय वर्तुळात गोंधळ निर्माण झाला असतानाच, पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी यावर आपली महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांमध्ये फिरत असलेल्या यादीत तांत्रिक त्रुटी असल्याचे सांगत त्यांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या काही तासांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनियुक्त कार्यकारणीची एक यादी माध्यमांमध्ये प्रसिद्ध होत होती. मात्र, या यादीतील नावांवरून पक्षात आणि कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. या गोंधळाची दखल घेत सुनेत्रा पवार यांनी मध्यरात्री ट्वीट करत अधिकृत भूमिका स्पष्ट केली.

SPOT NEWS

## बेरोजगार युवक-युवतींसाठी मोफत व्यावसायिक प्रशिक्षण कार्यशाळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी कौशल्याधारित प्रशिक्षणासह रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या माय भारत आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन संचलित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या संयुक्त विद्यमाने ४५ दिवसांच्या मोफत कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत प्लंबिंग मल्टी स्किल तसेच सीएनसी मशीन ऑपरेटिंग या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर युवक-युवतींना रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. बेरोजगार तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष आणि प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या व्यवस्थापक दिवाकर भोयर यांनी केले आहे. विशेष म्हणजे हे दोन्ही प्रशिक्षण कोर्स निवासी स्वरूपाचे असून, प्रशिक्षणादरम्यान राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था आयोजकांकडून करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्यही मोफत पुरविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवतींनाही या प्रशिक्षणाचा लाभ घेणे सोपे होणार आहे. या प्रशिक्षणासाठी किमान शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण अशी ठेवण्यात आली असून, निवडलेल्या कोर्सनुसार पात्रता निश्चित केली जाणार आहे. अर्जदारांचे वय १८ ते ३० वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी मार्कशीट, आधार कार्ड, टी.सी. आणि सहा पासपोर्ट आकाराचे फोटो आवश्यक राहणार आहेत. प्रशिक्षणाचे आयोजन नगर-पुणे रोडवरील स्माईल स्टोन हॉटेलजवळ, कामरगाव (ता. नगर, जि. अहिल्यानगर) येथे करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणीची अंतिम तारीख १४ मे निश्चित करण्यात आली आहे. जागा मर्यादित असल्याने प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. या कार्यशाळेत अनुभवी व प्रशिक्षित शिक्षकांकडून प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले जाणार आहे. तांत्रिक कौशल्यांसोबतच व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य आणि व्यावसायिक शिस्त यांसारख्या बाबींवरही विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यास या उपक्रमाची मोठी मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. अधिक माहितीसाठी श्रीकृष्ण मुरकुटे (मो. ९२२५७७६९९५) यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

## शिक्षक आ. किशोर दराडे यांची नगरमध्ये शुक्रवारी बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक आयोजित करण्यात आले आहे. ही बैठक शुक्रवार दि. १५ मे रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली. या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे.

# जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून महंतांविरोधातील अवमानकारक वक्तव्यांचा निषेध

### वारकरी संप्रदाय आणि हिंदुत्वासाठी कार्य करणाऱ्या महंतांच्या पाठीशी । देवगड व सरलाबेट येथे भेट घेत पाठिंबा

**● लोणी । वीरभूमी -**

हिंदुत्वासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या महंतांबद्दल करण्यात आलेले शब्दप्रयोग निषेधार्ह असून, अहील्यानगरचे भूमीपुत्र आचार्य गोविंददेव गिरीजी महाराज, महंत भास्करगिरी महाराज आणि महंत रामगिरी महाराज यांच्या पाठीशी हिंदू धर्मातील सर्व समाजघटक खंबीरपणे उभे असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.





हिंदू धर्म आणि वारकरी संप्रदायासाठी कार्य करणाऱ्या महंतांबद्दल करण्यात आलेल्या उल्लेखाच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांनी श्रीक्षेत्र देवगड येथे महंत भास्करगिरी महाराज तसेच सरलाबेट येथे जाऊन महंत रामगिरी महाराज यांची भेट घेतली.

मागील काही दिवसांपासून राज्यात वारकरी संप्रदाय आणि हिंदू धर्मासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींविषयी अवमानकारक लिखाण व शब्दप्रयोग करून वारकरी संप्रदायात फूट पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. मात्र अनेक वर्षांची परंपरा लाभलेला वारकरी संप्रदाय कोणाच्याही वक्तव्याने विचलित होणारा नाही. उलट हिंदुत्वासाठी संत परंपरेचा वारसा घेऊन वारकरी संप्रदाय अधिक एकसंघपणे आणि जोमाने कार्य करेल तसेच समाजाला अध्यात्माच्या माध्यमातून बांधून ठेवेल, असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्यासह पदाधिकारी आणि वारकरी संप्रदायातील कार्यकर्ते उपस्थित होते.

अहील्यानगरचे भूमीपुत्र आचार्य गोविंददेव गिरीजी महाराज, ह.भ.प. भास्करगिरी महाराज आणि ह.भ.प. रामगिरी महाराज यांच्याबद्दल करण्यात आलेल्या शब्दप्रयोगाचा तीव्र निषेध करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, देव, देश आणि धर्मासाठी जीवन समर्पित करणाऱ्या व्यक्तींविषयी बोलताना काय बोलतो याचे भान काहींना राहिलेले नाही.

वारकरी कधीच निधर्मी होऊ शकत नाही. वारकरी परंपरेला धर्माचे अधिष्ठान आहे. संप्रदायाच्या ताकदीमुळे समाज उभा आहे. कोणाच्याही मतामुळे हे अधिष्ठान कदापि दूर होऊ शकणार नाही. प्रत्येक गोष्टीकडे 'व्होट बँक' म्हणून पाहणारे लोक मात्र 'लव्ह जिहाद'पासून ते 'कॉर्पोरेट जिहाद'पर्यंतच्या घटनांवर मौन बाळगतात. परंतु हिंदुत्वासाठी अशा घटनांवर परखड भूमिका मांडणाऱ्या महंतांविषयी अवमानकारक शब्दप्रयोग करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न निंदनीय आहेत, असेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

## पुणतांबा फाट्यावर वाहतूक कोंडी; संवत्सर येथील पुलाचे व रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करा : सौ. कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी-**

मतदारसंघातील मुंबई-नागपूर मार्गावरील संवत्सर येथील जुन्या पुलासह रस्त्याचे काम मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असून याचा जड वाहनधारकांना मोठा फटका बसत आहे. संबंधित रस्ता बंद असल्यामुळे पर्यायी मार्ग म्हणून पुणतांबा फाटा मार्गे वाहतूक सुरू आहे. त्यामुळे नगर मनमाड महामार्ग शिर्डी कोपरगाव मार्गावरील पुणतांबा फाटा येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून या कोंडीचा त्रास सर्वसामान्य वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना रस्त्याचे व संवत्सर येथील पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मागील अनेक महिन्यांपासून मुंबई-नागपूर मार्गावरील संवत्सर येथील पुलाचे व रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. सध्याच्या स्थितीत संवत्सर येथील पूल पूर्णपणे बंद असून रस्ताही अनेक ठिकाणी खोदण्यात आलेला आहे. त्यामुळे जड वाहतूक पुणतांबा फाट्यावरूनच सुरू आहे. अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

पुणतांबा फाट्यावर एकाच मार्गावर जड वाहतूक तसेच प्रवासी वाहने मोठ्या प्रमाणात येत असल्याने पुणतांबा फाट्यावरील चौफुलीत दररोज मोठ्या वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. रस्त्याचे व संवत्सर येथील पुलाचे काम वेळेत पूर्ण होत नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिक व वाहनधारकांची मोठी तारांबळ उडत आहे. अनेक नवीन वाहनधारक पुलापर्यंत येऊन पुन्हा माघारी फिरत असून ते परत पुणतांबा फाट्यावर येतात. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होत आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांना व वाहनधारकांना दिवसातून अनेकदा तासन्तास त्या ठिकाणी थांबून अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# साठवण बंधाऱ्यातील गाळ काढण्यासाठी तातडीने परवानगी द्या

### संभाजी ब्रिगेडचे श्रीगोंदा तहसीलदारांना निवेदन

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्रीगोंदा तालुक्यातील स्थानिक स्तरावरील लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद बंधारे तसेच पाझर तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला असून हा गाळ शेतकऱ्यांना शेत तयार करण्यासाठी उपलब्ध करून देण्यास तातडीने परवानगी द्यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने श्रीगोंदा तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तहसीलदारांच्या वतीने नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांनी निवेदन स्वीकारले.



तलावांमधील गाळ काढल्यास बंधाऱ्यांचे खोलीकरण व रुंदीकरण होऊन मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यास मदत होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी सांगितले की, शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या मृद व जलसंधारण विभागाच्या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना तलावातील गाळ काढण्यासाठी तातडीने परवानगी देण्यात यावी. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने कोणतीही अट न घालता त्वरित उपाययोजना करून तलावातील गाळ काढण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

भविष्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता जास्तीत जास्त तलाव खोल करून पाणीसाठा वाढविणे गरजेचे आहे. यामुळे शेतीला मोठा फायदा होणार असून पाणीटंचाई कमी करण्यास मदत होईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# हनुमान टेकडीवर महामृत्युंजय यज्ञ व शिवमहापुराण कथेचे आयोजन

### १३ ते १९ मे दरम्यान सात दिवसीय धार्मिक सोहळा; भाविकांनी लाभ घ्यावा : महंत लालदास महाराज

**● पाथर्डी । वीरभूमी-**

पाथर्डी-मोहटादेवी रस्त्यावरील हनुमान टेकडी येथे बुधवार, दि. १३ मे ते मंगळवार, दि. १९ मे दरम्यान महामृत्युंजय यज्ञ व शिवमहापुराण महाकथेचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन हनुमान गडाचे महंत महामंडलेश्वर लालदास महाराज यांनी केले आहे.

पाथर्डी-मोहटादेवी मार्गावरील अकरा फुटी हनुमान मंदिर टेकडीवर सात दिवसीय या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या यज्ञ सोहळ्यात उज्जैन येथील ब्राह्मण पंडितांच्या हस्ते सव्वा लाख महामृत्युंजय जप तसेच १५ हजार हवन करण्यात येणार आहे.


सुख, समृद्धी, धनधान्य आणि ऐश्वर्य लाभावे, रोगराई दूर व्हावी, कालसर्प दोष आणि अकाल मृत्यूचे संकट टळावे तसेच लोककल्याणाच्या भावनेतून धार्मिक उद्देशाने या महामृत्युंजय यज्ञ व शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आल्याचे लालदास महाराज यांनी सांगितले.

या सात दिवसीय सोहळ्यात दररोज अभिषेक आणि हवन होणार असून सायंकाळी ६ ते ९ या वेळेत भीमाशंकर येथील बालकदास महात्यागी आपल्या रसाळ वाणीतून शिवमहापुराण कथेचे निरूपण करणार आहेत.

या धार्मिक कार्यक्रमास भीमाशंकर येथील पुजारी रामचरणदास, ठाकूरदास महात्यागी, अमरदास महात्यागी, मनोहरदास महात्यागी, घनश्यामदास महात्यागी यांच्यासह विविध ठिकाणचे संत-महंत उपस्थित राहणार आहेत.

पूर्णाहुतीच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या यज्ञकुंडाला पाच प्रदक्षिणा घातल्यास दुःख दूर होऊन सुख-शांती लाभते, असा विश्वास महंत महामंडलेश्वर लालदास महाराज यांनी व्यक्त केला.





दरम्यान, पाथर्डी-मोहटादेवी रस्त्यावरील कारेगाव परिसरात महामंडलेश्वर लालदास महाराज गेल्या ३० वर्षांपासून हनुमान गडाचे महंत म्हणून कार्यरत आहेत. भाविकांच्या सहकार्याने त्यांनी येथे शारदीय नवरात्र उत्सवात हनुमान अकरा फुटी हनुमान मूर्तीची स्थापना करून भव्य मंदिर उभारले आहे.

गेल्या ३० वर्षांपासून देवस्थानच्या वतीने मोहटादेवी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी मोफत फराळ आणि नाश्त्याची व्यवस्था करण्यात येत असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती जाहिरातीस मुदतवाढ द्या

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

संच मान्यता कनिष्ठ महाविद्यालयांची उपलब्धता अद्यापही प्रलंबित असल्याने पवित्र पोर्टलमार्फत होणाऱ्या शिक्षक भरतीच्या जाहिरातीस मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी वर्षाताई गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन त्यांच्या मार्फत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच शिक्षण आयुक्तांकडे पाठविण्यात आले आहे. यावेळी शिक्षक परिषदेचे कोषाध्यक्ष बबन शिंदे, सुनिल दानवे, संजय पालवे, अशोक पवार, रावसाहेब गाणखेर, सुरेश सरोटे, मच्छिंद्र ढाकणे, एम. एस. साखरे, ए. पी. क्षीरसागर, जी. एम. शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील संच मान्यतेतील रिक्त पदांच्या आधारे पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. मात्र, माध्यमिक विभागाशी संलग्न असलेल्या अनेक कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता अद्याप प्रलंबित असल्यामुळे संबंधित शाळांमध्ये रोस्टर तपासणी आणि रिक्त शिक्षक पदांची जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी भरती प्रक्रियेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.शिक्षक परिषदेने शासनाकडे मागणी करताना स्पष्ट केले की, कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता उपलब्ध झाल्यानंतरच भरती जाहिरातीची अंतिम मुदत निश्चित करण्यात यावी. तसेच राज्यातील बहुसंख्य शिक्षकांची जन्मतारीख १ जून असल्याने दरवर्षी ३० जून रोजी मोठ्या प्रमाणावर शिक्षक सेवानिवृत्त होतात. त्यामुळे अनेक विद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर शिक्षक परिषदेने शासनाला विनंती केली आहे की, पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रियेसाठी ३१ मे २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या जागांचा विचार करण्याऐवजी ३० जून २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या पदांचा आधार घ्यावा. त्यानुसार भरती जाहिरातीस मुदतवाढ देऊन सर्व रिक्त पदांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## झोपडपट्टीतील मुलांसाठी 'संगणक साक्षर रथ' उभारण्याची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

झोपडपट्टी भागातील तसेच कचरा वेचक, हातमजूर आणि वंचित घटकातील मुलांना आधुनिक डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संगणक साक्षर रथ हा अभिनव फिरता संगणक शिक्षण प्रकल्प राबविण्याचा मानस कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी आर्थिक तसेच प्रशासकीय सहकार्य मिळावे, अशी मागणी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. अहिल्यानगर शहरात सुमारे २२ झोपडपट्ट्या असून शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी तब्बल ५० % अधिक लोकसंख्या झोपडपट्टी भागात वास्तव्यास असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीत दोन संसारांना मिळाला नवजीवनाचा आधार

**न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांच्या समन्वयातून दोन दांपत्यांचे वाद मिटले । लोकअदालतीतून सामाजिक सलोख्याचा संदेश**

**पाथर्डी । वीरभूमी –**

राष्ट्रीय लोकअदालत दोन जोडप्यांसाठी अक्षरशः ईश्वरी शक्तीप्रमाणे ठरली. न्यायाधीश, वकील आणि दोन्ही बाजूंच्या पक्षकारांच्या सकारात्मक समन्वयातून दोन संसार पुन्हा एकदा रुळावर आले. न्यायालयासमोर वाद मिटल्याचे जाहीर होताच दोन्ही जोडप्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान शब्दांच्या पलीकडचे होते.

येथील न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत केवळ न्यायदानावरच नव्हे, तर सामाजिक सलोखा, कौटुंबिक स्नेह आणि शांतता अबाधित राखण्यावर विशेष भर देण्यात आला. अनेक वर्षांपासून तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील पती–पत्नीमधील वाद न्यायालयात सुरू होता. हा वाद किरकोळ कारणांमुळे आणि गैरसमजुतीतून निर्माण झाल्याचे दोन्ही बाजूंच्या वकिलांच्या निदर्शनास आले.



लोकअदालतीत सकारात्मक तोडगा निघू शकतो, या विश्वासाने न्यायाधीशांनी दोन्ही पक्षांना समजावून सांगितले. संसारातील गोडवा वादातून टिकत नाही. त्यामुळे दोन्ही कुटुंबांमध्ये अस्वस्थता निर्माण होते, असे सांगत प्रेमाने संसार करण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर बबीता तिजोरे आणि प्रभाकर तिजोरे या दांपत्याने पुन्हा एकत्र येत आनंदाने संसार करण्याचा निर्णय घेतला.

हा निर्णय जाहीर होताच उपस्थितांनी दोघांनाही शुभेच्छा देत नांदा सौख्यभरे असा आशीर्वाद दिला. संसाराचा आनंद घ्या, कुटुंबावर चांगले संस्कार करा. भांडणात आयुष्य वाया घालवण्यापेक्षा परस्परांच्या सुखदुःखात सहभागी होत आयुष्याला नवा आकार द्या, असा मोलाचा सल्ला न्यायाधीशांनी दिला.

यावेळी न्यायाधीश रविकिरण सपाटे, न्यायाधीश एस. डी. वाघमारे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र खेडकर तसेच वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. अर्जदाराच्या वतीने ॲड. नितीन वायभासे, तर प्रतिवादीच्या बाजूने ॲड. निलेश दातार यांनी काम पाहिले.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील निकिता नाईक आणि राजू नाईक या नवदांपत्यातील वादही लोकअदालतीत मिटला. किरकोळ कारणातून विकोपाला गेलेल्या वादावर न्यायाधीश आणि वकिलांनी समुपदेशन केले. न्यायालयाने संसाराची घडी विस्कटू नये म्हणून दिलेली संधी ही नशिबाची संधी समजून पुन्हा नव्याने संसार सुरू करू, असा निर्णय घेत दोघांनी पुन्हा एकत्र येण्याचे मान्य केले. या प्रकरणात ॲड. राजेंद्र (राणा) खेडकर आणि ॲड. शाहरुख शेख यांनी काम पाहिले.

दोन्ही जोडप्यांचे मनोमिलन झाल्यानंतर न्यायाधीश सपाटे आणि न्यायाधीश वाघमारे यांनी कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. पती–पत्नीने संवादातून मतभेद दूर करत संसारातील गोडवा आणि जबाबदारी यांचे भान राखावे, असा सल्ला त्यांनी दिला.

लोकअदालतीच्या माध्यमातून किरकोळ आणि शुल्लक वाद गंभीर स्वरूप धारण करू नयेत, तसेच वादी–प्रतिवादी यांच्यातील सलोखा, प्रेम आणि संवाद कायम राहावा, हा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. आयुष्याच्या प्रवासात माणसं जोडायला शिका; माणसं तोडून आयुष्य कमी करू नका, हा न्यायाधीशांचा संदेश उपस्थितांना भावला.

राग, लोभ, अहंकार आणि सूडभावना यांचे दुष्परिणाम समाजासाठी घातक ठरतात. अशा भावना वाढीस लागू न देता संवादातून प्रश्न सोडवावेत, असा संदेशही यावेळी देण्यात आला. न्यायाधीश आणि वकिलांच्या या संवेदनशील संवादामुळे लोकअदालतीचे वातावरण अधिक सकारात्मक आणि हलकेफुलके झाले.

या लोकअदालतीपुढे एकूण ५१०३ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २३५६ प्रकरणांचा तडजोडीद्वारे निपटारा करण्यात आला. यामधून सुमारे २९ लाख रुपयांची वसुली झाल्याची माहिती वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रा. ना. खेडकर यांनी दिली.

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या आंदोलनाला माध्यमिक शिक्षक संघाचा पाठिंबा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

कनिष्ठ महाविद्यालयीन संच मान्यतेचे प्रचलित निकष बदलण्याच्या विरोधात महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनास अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने जाहीर पाठिंबा दिला आहे. शैक्षणिक समस्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक व माध्यमिक शिक्षक सोबत शासनस्तरावर संघर्ष करणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी दिली.

संच मान्यतेचे विद्यमान निकष हे अनेक वर्षांपासून शासन निर्णयानुसार कार्यरत असून, कोणतीही व्यापक चर्चा न करता ते बदलण्याचा प्रयत्न होत असल्याने राज्यातील हजारो शिक्षकांच्या नोकरीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर व शिक्षण व्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

महासंघाने मांडलेल्या मागण्या या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हिताच्या असून शासनाने त्या सकारात्मकपणे मान्य कराव्यात, अशी आमची मागणी आहे. शिक्षण क्षेत्रातील स्थैर्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शिक्षकांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी प्रचलित संच मान्यता निकष कायम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाने केलेल्या न्याय्य आंदोलनास आमच्या संघटनेचा नैतिक व संघटनात्मक पाठिंबा कायम राहील. या आंदोलनाप्रसंगी दिलेले आश्वासन पाळले नाही व संच मान्यतेसाठी निकषांबाबत सकारात्मक धोरण नसेल तर कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघासोबत अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ सुद्धा आंदोलनात उतरेल असा इशारा अध्यक्ष सचिन झगडे यांनी दिला.

## कोपरगाव शहराच्या हद्दवाढ भागासाठी स्वतंत्र वीज वाहिनी टाका : आ. आशुतोष काळे

**कोपरगाव । वीरभूमी–**

शहराच्या हद्दवाढ झालेल्या भागातील नागरीकांना अनियमितपणे वीजपुरवठा होत असल्यामुळे घरगुती वीज ग्राहकांना व छोट्या मोठ्या व्यावसायिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. त यासाठी कोपरगाव शहराच्या हद्दवाढ झालेल्या भागासाठी कोपरगाव सबस्टेशनमधून स्वतंत्र वीज वाहिनी टाका अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या पत्रात केल्या आहेत.

दिलेल्या पत्रात आमदार आशुतोष काळे यांनी असे म्हटले आहे की, कोपरगाव शहराचा दिवसेंदिवस विस्तार वाढत चालला असून कोपरगाव शहराच्या सभोवताली अनेक नवीन उपनगरे वसली आहेत. कोपरगाव शहराच्या या उपनगरांपैकी माधवनगर, सानपवस्ती, देवकर प्लॉट आणि गवारे वस्ती या परिसराचा समावेश जरी नगरपालिकेत झाला असला तरी या भागाला अद्यापही ग्रामीण भागातून वीज पुरवठा केला जात आहे.त्यामुळे अनेक वेळा या उपनगरातील नागरीकांना अनियमितपणे वीजपुरवठा होत असतो.

सध्या उष्णता मोठ्या प्रमाणात वाढली असून वीज गेल्यानंतर उष्णतेचा त्रास अधिकच वाढतो. अशावेळी शेजारच्या उपनगरात किंवा कोपरगाव शहरात वीज असते परंतु आम्हाला मात्र अंधारात राहावे लागते त्याचा परिणाम छोट्या मोठ्या व्यावसायिकांच्या व्यवसायावर होवून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. कोपरगाव नगरपरिषदेच्या हद्दवाढ झालेल्या माधवनगर, सानपवस्ती, देवकर प्लॉट आणि गवारे वस्तीमधील नागरिकांना नगरपालिकेच्या इतर सर्व नागरी सुविधा मिळत आहेत. मात्र वीज वितरणाची व्यवस्था अद्यापही ग्रामीण फिडरवरच अवलंबून असल्याने या भागातील रहिवाशांना अनेक अडचणींना सामारे जावे लागत आहे.

माधवनगर, सानपवस्ती, देवकर प्लॉट आणि गवारे वस्तीमधील नागरिकांना येणाऱ्या अडचणींची गंभीर दखल घेवून आमदार आशुतोष काळे यांनी या हद्दवाढ झालेल्या भागाला शहराच्या सबस्टेशनला निरंतर वीज योजने अंतर्गत जोडण्यासाठी स्वतंत्र फिडर अर्थात वीज वाहिनी टाकण्याच्या सूचना महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना दिल्या आहेत.

# रुक्मिणी–पांडुरंग मंदिराच्या पुनर्निर्माणासाठी सर्वतोपरी सहकार्य

**आ. मोनिका राजळे । लोकसहभागातून प्राचीन मंदिराच्या पुनर्बांधणीस प्रारंभ; सभागृहासाठी १५ लाखांचा निधी**

**पाथर्डी । वीरभूमी–**

प्राचीन धर्मस्थळे आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याची जबाबदारी नागरिकांसह सर्व लोकप्रतिनिधींची असून, शहरातील श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन स्थळांच्या विकासासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. अशा धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

नारायण कृपा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शहरातील सुमारे ३०० वर्षांचा इतिहास असलेल्या स्वयंभू आणि जागृत रुक्मिणी–पांडुरंग मंदिर व मठाच्या पुनर्निर्माण कार्यास लोकसहभागातून प्रारंभ करण्यात आला आहे. या कामासाठी आमदार मोनिका राजळे यांच्या विशेष प्रयत्नांतून सभागृह बांधकामासाठी सुमारे १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. भूमिपूजन समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टचे अध्यक्ष गोविंद महाराज जाटदेवळेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, गटनेत्या डॉ. शारदा गर्जे, नगरसेविका मनीषा उदमले, वंदना टेके, नगरसेवक सुभाष बोरुडे, संजय भागवत, बंडू देशमुख, प्रतीक नांगरे, नंदकुमार शेळके, बाजार समितीचे उपसभापती कुंडलिकराव आव्हाड, भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्ष ज्योती शर्मा, मोहन सुडके महाराज, संजय वारे महाराज, मुकुंद लोहिया, रमणशेठ लाहोटी, सिंधुताई साठे, तालुका संघाचे संचालक अशोक मंत्री, ज्येष्ठ कार्यकर्ते राजेंद्र दुधाळ, कोष्टी समाज ट्रस्टचे सचिव किशोर पारखे आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, पालिकेच्या माध्यमातून विविध विकासकामे होत असली तरी शहरातील पांडुरंग शास्त्री श्रोत्रिय मठाला ऐतिहासिक महत्त्व आहे. शहरात कोष्टी समाज बांधवांची संख्या मोठी असून या समाजाचे श्रद्धास्थान म्हणून या मठाची स्वतंत्र ओळख आहे.

त्या पुढे म्हणाल्या, गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे प्राचीन मंदिराची पडझड झाली होती. विठ्ठल–रुक्मिणीच्या मूर्तींचेही नुकसान झाले. त्यामुळे संपूर्ण मठाचे पुनर्निर्माण आणि नव्या मूर्तींची स्थापना करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळाने घेतला. हा विषय केवळ विश्वस्त मंडळ किंवा एखाद्या कुटुंबापुरता मर्यादित नसून, शहरातील सर्व नागरिकांच्या श्रद्धेशी निगडित आहे.

यापूर्वी अनेक भाविकांनी मदतीचा हात पुढे केला आहे. मंदिर उभारणीच्या कार्यात ज्या पद्धतीने योगदान दिले जाते, त्याचे अनेकपटीने पुण्य लाभते. कासार पिंपळगाव येथील रुक्मिणी–पांडुरंग मंदिरातील मूर्ती अनेक वर्षे अप्पासाहेब राजळे आणि मोहिनीताई राजळे यांनी आपल्या घरी अत्यंत भक्तिभावाने जतन केल्या होत्या. अशा सेवेचे संस्कार पुढील पिढीतही कायम आहेत, असेही त्यांनी सांगितले.

ईश्वराची सेवा ही ईश्वरच करून घेतो; आपण फक्त माध्यम असतो. पूर्वजन्मीचे पुण्य असल्याशिवाय अशी सेवा घडत नाही. त्यामुळे जागृत आणि भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या मंदिरांच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. प्रसंगानुरूप वाढीव निधी देण्याचाही विचार करू, असे आश्वासन त्यांनी दिले.



निधी मंजुरी प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणी दूर करत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यास काहीसा विलंब झाल्याचे त्यांनी नमूद केले. विश्वस्त मंडळाची आपल्या हस्ते भूमिपूजन व्हावे अशी इच्छा होती. त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. येथे जे कार्य पूर्ण करण्याची संधी मिळेल, त्याकडे आपण सेवाभावाने पाहून सक्रिय सहकार्य करू, असेही त्या म्हणाल्या.

लवकरच अधिक मास सुरू होत असल्याने धार्मिक कार्य आणि दानधर्माला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. भाविकांनी मंदिर बांधकामासाठी वस्तूरूपाने किंवा आर्थिक स्वरूपात मदत करावी, असे आवाहनही आमदार राजळे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक अमोल गर्जे पाटील यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश मंत्री आणि मधुरा गोरे यांनी केले, तर आभार ज्योती श्रोत्रीय यांनी मानले.

# पालिकेतील १८ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## कार्यालयीन वेळेत गैरहजेरीचा ठपका । २४ तासांत खुलासा सादर करण्याचे आदेश

**पाथर्डी । वीरभूमी –** शहरातील प्रमुख प्रशासकीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत तसेच नागरिकांना मिळणाऱ्या वागणुकीबाबत सर्वसामान्यांमध्ये तीव्र असमाधान व्यक्त होत आहे. कशाचाच कशाला आणि कोणाचाच कोणाला ताळमेळ नाही, असे चित्र अनेक शासकीय कार्यालयांत दिसून येत असल्याची चर्चा आहे. कार्यालयीन वेळेत कर्मचारी गैरहजर असल्याची गंभीर दखल घेत पालिका प्रशासनाने तब्बल १८ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावत २४ तासांत खुलासा मागविला आहे. या कारवाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड यांनी काही दिवसांपूर्वी दुपारी साडेतीनच्या सुमारास पालिका कार्यालयात अचानक भेट देऊन कर्मचारी उपस्थितीची पाहणी केली आणि त्याचे चित्रीकरण केले. कर्मचाऱ्यांची वाट पाहत बसलेल्या गरजू नागरिकांचेही चित्रण करण्यात आले. अशा प्रकारे कारभार सुरू असेल तर शासन व जनतेच्या डोळ्यांत धूळफेक केली जात आहे. रखरखत्या उन्हात वेळ, श्रम आणि पैशांचा अपव्यय सहन करत नागरिकांना हेलपाटे मारावे लागत असतील, तर याची दखल घेऊन कारवाई कोण करणार? असा सवाल आव्हाड यांनी उपस्थित केला होता.

गेल्या शुक्रवारी दुपारी ३ वाजून ३४ मिनिटांनी आव्हाड यांनी पालिकेतील विविध विभागांना भेट दिली असता अनेक कर्मचारी अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. बहुसंख्य कर्मचारी स्थानिक असल्यामुळे ते कोणालाही जुमानत नसल्याची तक्रार यापूर्वीही त्यांनी वेळोवेळी केली होती.



आव्हाड यांनी केलेली चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर पालिका प्रशासनासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेतली. त्यानंतर पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी मंगळवारी सायंकाळी कडक शब्दांत कारणे दाखवा नोटीस बजावत संबंधित १८ कर्मचाऱ्यांकडून २४ तासांत लेखी खुलासा मागविला.

नोटिशीत मुख्याधिकारी लांडगे यांनी नमूद केले आहे की, कार्यालयीन वेळेत कर्मचारी हजर नसल्याचे आढळून आले असून ही बाब कार्यालयीन शिस्तीला धरून नाही. यापूर्वीही अनेक वेळा कार्यालयीन वेळेत कार्यालय सोडू नये, तसेच शासकीय कामासाठी बाहेर जाताना हालचाल नोंदवहीत संबंधित कार्यालय, कामाचे स्वरूप व वेळ नमूद करणे बंधनकारक असल्याचे लेखी व तोंडी आदेश देण्यात आले होते. मात्र त्याचे पालन करण्यात आले नाही.

तसेच, या वर्तणुकीमुळे पालिका प्रशासनाची प्रतिमा मलिन होत आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९८२ तसेच महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ अंतर्गत कारवाई व वेतन थांबविण्याची कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत समाधानकारक खुलासा २४ तासांत सादर करावा, असेही नोटिशीत म्हटले आहे. या नोटिशीची प्रत नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनाही देण्यात आली आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना किसन आव्हाड म्हणाले की, शहरातील अनेक कार्यालयांमध्ये स्थानिक अथवा तालुक्यातील कर्मचारी मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. काही कर्मचाऱ्यांचे राजकीय नेत्यांशी संबंध असल्याने ते स्वतःला प्रभावशाली समजतात. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांशी जबाबदारीने व आदराने वागले जात नाही.

ते पुढे म्हणाले, स्वच्छता विभाग आणि पाणीपुरवठा विभागातील कामकाजाबाबतही नागरिकांमध्ये नाराजी आहे. पाणीपुरवठ्याबाबत विचारणा केल्यास समाधानकारक उत्तरे दिली जात नाहीत. घंटागाड्यांवर नेमके कोणाचे नियंत्रण आहे, असा प्रश्न निर्माण होतो. काही कर्मचारी तर नगरसेवकांनाही जुमानत नाहीत. प्रशासनाने नाठाळ, कामचुकार व स्वतःला पुढारी समजणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केल्याशिवाय त्यांना कर्तव्याची जाणीव होणार नाही.

येणाऱ्या काळात शहरातील सर्व कार्यालयांमध्ये 'जबाबदार नागरिक, जागरूक नागरिक' या संकल्पनेअंतर्गत पाहणी दौऱ्याला व्यापक स्वरूप दिले जाणार आहे, असेही आव्हाड यांनी सांगितले.

# संवत्सर येथील पुलाचे काम जलद गतीने पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी वाहतूक सुरु करा : आ.आशुतोष काळे

**कोपरगाव । वीरभूमी–** राज्यातील प्रमुख शहरांना जोडणाऱ्या कोपरगाव मतदार संघातील जुन्या मुंबई-नागपूर (एन. एच.७५२आय) महामार्गावरील संवत्सर येथील गोदावरी नदीवरील पुलावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे बुजवण्याचे काम अतिशय धीम्यागतीने सुरु आहे. पावसाळा तोंडावर येवून ठेपला असतांना हे काम वेळेत पूर्ण होणे अपेक्षित आहे. परंतु सुरु असलेले दुरुस्तीचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून या मुंबई–नागपूर महामार्गाच्या लगत असणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील अनेक गावातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले असून त्यांचे व्यवसाय धोक्यात आले आहेत. कोपरगाव शहराला जोडणारा तालुक्याच्या पूर्व भागातील हा अतिशय महत्वाचा मार्ग बंद असल्यामुळे शेतकऱ्यांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे पुलाच्या दुरुस्तीचे कामाला गती देवून पावसाळ्यापूर्वी पुलावरून वाहतूक सुरु करण्याच्या सूचना आ. काळे यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.



दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असलेला जुना मुंबई-नागपूर (एन.एच.७५२ आय) महामार्गावरील गोदावरी नदीवरील बांधण्यात आलेल्या संवत्सर येथील पुलाला मध्यभागी भगदाड पडल्यामुळे प्रवाश्यांच्या सुरक्षेसाठी पुलावरून होणारी वाहतूक थांबविण्यात आली आहे. आमदार आशुतोष काळे यांनी केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री ना.नितीन गडकरी यांची दिल्ली येथे त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्याकडे या पुलाच्या दुरुस्तीसाठी विशेष निधीची मागणी केली होती. त्या मागणीची तातडीने दखल घेवून मंत्री ना. नितीन गडकरी यांनी या पुलाच्या दुरुस्तीसाठी दिलेल्या निधीतून या पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे मात्र हे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे.

त्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी कधी खुला होईल याकडे वाहन चालकांचे व पूर्व भागातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. कारण पावसाळा सुरु होण्यासाठी काही दिवसांचा अवधी शिल्लक राहिला असून पाऊस सुरु झाल्यानंतर दुरुस्तीचे काम करता येणार नाही.त्यामुळे सुरु असलेल्या कामाचा वेग वाढवावा व पावसाळा सुरु होण्यापूर्वी या महामार्गावरील वाहतूक सुरु करावी. तसेच या महामार्गाच्या लगत पावसाचे पाणी वाहून नेणारे अनेक नैसर्गिक स्त्रोत बंद आहेत त्यामुळे पावसाचे पाणी साचून रस्त्याचे नुकसान होवू शकते. त्यासाठी हे नैसर्गिक स्त्रोत खुले करून द्या जेणेकरून पाणी साचून न राहता नैसर्गिक पद्धतीने पाणी वाहून जाईल.अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी राष्ट्रीय महामार्ग (एन.एच.७५२ आय) च्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# बितनगडावर महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

**कळसूबाई मित्र मंडळाचा ऐतिहासिक उपक्रम**

**अकोले । वीरभूमी–** वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या ४८६ व्या जयंतीनिमित्त कळसूबाई मित्र मंडळ, घोटी यांच्या वतीने अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवरील ऐतिहासिक बितनगडावर उत्साहात अभिवादन कार्यक्रम पार पडला. गड–किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व जपण्यासोबतच तरुण पिढीमध्ये स्वराज्य, शौर्य आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा जागविण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

गेल्या तीन दशकांपासून महाराष्ट्रातील विविध गड–किल्ल्यांवर धार्मिक आणि ऐतिहासिक उपक्रम राबविणारे कळसूबाई मित्र मंडळ यंदाही महाराणा प्रताप जयंतीनिमित्त बितनगडावर एकत्र आले होते. कळसूबाई शिखर आणि विश्रामगड यांच्या दरम्यान असलेल्या या गडावर महाराणा प्रताप तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी महाराणा की जय हो, शिवा की जय हो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. महाराणा प्रताप हे त्याग, तपस्या, बलिदान, स्वाभिमान आणि अखंड स्वातंत्र्याचे प्रतीक असल्याचे सांगत त्यांच्या शौर्यगाथेचा गौरव करण्यात आला.

तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षणासाठी छत्रपती संभाजी महाराजांना सहकार्य करणारे दुर्गादास राठोड यांचेही स्मरण करून अभिवादन करण्यात आले.

गड-किल्ल्यांचा इतिहास, स्थापत्यकला, प्रशासन, युद्धनीती आणि पराक्रमी राजांच्या शौर्याची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमात कळसूबाई मित्र मंडळाचे अध्यक्ष भगीरथ मराडे यांच्यासह अभिजीत कुलकर्णी, संजय शर्मा, डॉ. महेंद्र आडोळे, निलेश पवार, प्रवीण भटाटे, नगमा खलीफा, रेखा भटाटे, मृणाली सातपुते, प्रियांका मराडे, गोकुळ चव्हाण, सुधाकर तांबे, संजय शेवाळे, चेतन जोशी, नामदेव जोशी, नारायण नाठे आणि गोकुळ सूर्यवंशी सहभागी झाले होते.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात जागतिक परिचारिका दिन उत्साहात

## 'आमच्या परिचारिका, आमचे भविष्य' या संकल्पनेवर सेवाभाव, संशोधन आणि रुग्णसेवेचा गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी–** जागतिक परिचारिका दिनानिमित्त डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात विविध उपक्रमांनी सजलेला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आमच्या परिचारिका, आमचे भविष्य – सक्षम परिचारिका जीव वाचवतात या यंदाच्या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात परिचारिकांच्या सेवाभाव, समर्पण आणि आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. रामचंद्र पडळकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष श्री. सुनील कटारिया यांची उपस्थिती लाभली. उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. सलोमी तेलधुने यांनी यंदाच्या घोषवाक्याचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागतपर भाषणात परिचारिका या आरोग्य व्यवस्थेचा कणा असल्याचे सांगण्यात आले. सेवाभाव हीच परिचर्येची खरी ओळख आहे, या प्रेरणादायी विचारांद्वारे परिचारिकांच्या सेवाकार्याचा गौरव करण्यात आला.

रोटरी क्लब अहिल्यानगर सेंट्रल यांच्या वतीने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन अंतर्गत कॉलेज ऑफ नर्सिंगला बेस्ट कॉलेज अवार्ड : निःस्वार्थ सेवा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, समाजप्रबोधन उपक्रम तसेच रुग्ण आरोग्य सेवेमधील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्राध्यापिकांनाही विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याबद्दल गौरविण्यात आले. डॉ. प्रतिभा चांदेकर यांना सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. योगिता औताडे यांना सर्वोत्कृष्ट शिक्षणतज्ज्ञ पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. अमोल टेमकर आणि प्रा. सलोमी तेलधुने यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाला. श्री. निलेश म्हस्के आणि श्री. स्वप्नील म्हस्के यांना सर्वोत्कृष्ट मार्गदर्शक पुरस्काराने गौरविण्यात आले, तर कु. विद्या कुर्हे यांना सर्वोत्कृष्ट वर्गशिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक प्रगती, संशोधन, समुदाय आरोग्य जनजागृती, सामाजिक विस्तार उपक्रम आणि रुग्णसेवा या क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानासाठी संबंधितांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

प्रमुख पाहुणे श्री. सुनील कटारिया यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी १२ मे रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जातो. त्यांनी आधुनिक परिचर्या सेवेला नवी दिशा देत मानवसेवेचा आदर्श निर्माण केला. महाविद्यालयाच्या कार्याची प्रशंसा करताना त्यांनी परिचारिका शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाला रोटरी क्लब अहिल्यानगर सेंट्रलचे सचिव श्री. अमर गुरव, माजी अध्यक्ष श्री. राजेश परदेशी, मेडिकल डायरेक्टर व क्लब प्रभारी डॉ. श्रेया खजगीवाला तसेच श्री. सुनील मुथा उपस्थित होते.




आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध उपक्रम उत्साहात पार पडले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आयोजित स्पंदन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपले कलागुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच नर्सिंग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले. या लघुपटांमधून परिचारिका व्यवसायाचे महत्त्व, रुग्णसेवा आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी प्रभावीपणे मांडण्यात आली.

कार्यक्रमात फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या परिचर्या क्षेत्रातील योगदानावर आधारित पोस्टर्स आणि मॉडेल्सचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या उपक्रमांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रा. अमोल टेमकर यांनी आभार प्रदर्शन केले, तर कु. स्नेहल गोडेगोंकर आणि नॅन्सी क्रॉस यांनी सूत्रसंचालन केले.

सन्माननीय डॉ. सुजय विखे पाटील यांनी सर्वांना शुभेच्छा देत या यशाबद्दल अभिनंदन केले. तसेच प्रा. डॉ. अभिजित दिवटे, डायरेक्टर मेडिकल, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन यांनी मार्गदर्शन करून आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. कार्यक्रमाचा समारोप परिचारिकांच्या कार्याला सलाम करून करण्यात आला.